


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २९ वा गुरुवार दि. २७ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# धार्मिक कॉरिडॉर तयार करा, मुख्यमंत्री फडणवीसांचे निर्देश, त्र्यंबकेश्वरातील सिंहस्थ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्णय...

**वृत्तसंस्था/ नाशिक**

सिंहस्थ मेळ्यासाठी आलेला भाविक हा नाशिकजवळच्या त्र्यंबकेश्वर, शिर्डी, वणी, शनिशिंगणापूर, मांगीतुंगी अशा धार्मिक स्थळांनाही भेट देण्याच्या अनुषंगाने या धार्मिक स्थळांचे कॉरिडॉर तयार करा,फ असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले. नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ मेळ्याच्या तयारीसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत आढावा बैठक झाली. त्या वेळी त्यांनी नियोजनासंदर्भात सूचना केल्या. या वेळी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी प्रयागराजमधील सोयी-सुविधांचे सादरीकरण केले. हा सिंहस्थ कुंभ ङ्गडिजिटल टेक्नॉलॉजी कुंभफ म्हणून ओळखला जावा, यासाठीचे नियोजन करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी या वेळी दिले.मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये पायाभूत सुविधा वाढविण्यासंदर्भात निर्देश दिले आहेत. रामकाल पथचे काम वर्षभरात पूर्ण करून त्र्यंबकेश्वर मंदिराच्या संवर्धनाचे काम हाती घेण्याच्या सूचना केल्या आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करावा. गर्दीचे नियोजन, वाहतूक नियोजन; तसेच सर्व्हे लन्ससाठी जास्तीत जास्त ङ्गएआयफ तंत्रज्ञानाचा वापर करावा.ज्या भागातून जास्त गर्दी होते, त्या रस्त्यांवर गर्दीच्या नियोजनासाठी व भाविकांना वेळ घालविता यावा, यासाठी त्या ठिकाणी डिजिटल कुंभसंदर्भातील प्रदर्शन तयार करावे. सिंहस्थ मेळ्याचा लोगो तयार करण्यासाठी स्पर्धा घ्यावी, अशी सूचना फडणवीस यांनी केल्या आहेत.सिंहस्थासाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे मुंबई, जव्हार, गुजरात, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, धुळे, पुणे, मुंबई अशा मार्गांनी भाविक येणार असल्याने रस्ते मार्गाचे बळकटीकरण करण्याच्या सूचना फडणवीस यांनी केल्या आहेत. सिंहस्थ काळात बाहेरील वाहनांना बंदी घालून भाविकांसाठी वाहनतळ




ते शहरात प्रवासासाठी ई बसचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, असे त्यांनी सांगितले.शिर्डी, छत्रपती संभाजीनगर, ओझर या विमानतळांवरही प्रवाशांचे नियोजन करावे. शिर्डी विमानतळावर विमाने थांबविण्यासाठी जागा वाढविण्यात यावी, तसेच ओझर विमानतळावरही अधिक विमानांच्या लँडिंगसाठी सोय उपलब्ध करून द्यावी. नाशिक शहरात हेलिपॅड उभारता येतील का, याचा विचार करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी दिले आहेत.

# आयुष मंत्रालयाच्या अभियानाने केले ऐतिहासिक पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस...

**जनसंचलन/ बुलढाणा**

आयुष मंत्रालयाच्या वतीने देशभर राबविण्यात आलेल्या देश का प्रकृती परीक्षण अभियानाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाले असून या अभियानांतर्गत पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड ही आयुष मंत्रालयाच्या नावे नोंद झाले आहेत अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा येथे पत्रकार परिषदेत दिली केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्यावतीने २६ नोव्हेंबर संविधान दिनापासून ते २५ डिसेंबर २०२४ माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीचे औचित्य साधून संपूर्ण देशामध्ये देश का प्रकृती अभियान आयुष मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात आलं एका महिन्याच्या कालावधी देशातील एक कोटी २९ लाखाहून अधिक नागरिकांच्या प्रकृतीचे यशस्वीरित्या परीक्षण करण्यात आलं या परीक्षणाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाल्याची माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले याशिवाय या अभियानात नवीन पाच विश्व रेकॉर्ड प्रस्थापित झाले आहेत अशी माहिती ही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी दिले या अभियानाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रीय आयुर्वेददिनाच्या निमित्ताने करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले . देश का प्रकृती परीक्षण अभियानाला पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळाले आहेत ते आरोग्य सेवेबद्दल राष्ट्राच्या वचनेबद्धतेत आणि आयुर्वेदाला मिळत असलेल्या जागतिक मान्यतेचे प्रतीक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितलं येणाऱ्या काळामध्ये जिल्हा आणि तालुका स्तरावरही आयुर्वेदिक औषधालय क द्र सरकारच्यावतीने सुरु करण्यात येणार असल्याची माहिती आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी दिली देश का प्रकृती परिषद अभियानात १,८१६६७ स्वयंसेवकांनी योगदान दिले त्यांचेही आभार केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी माणले .देश का प्रकृतिक अभियानात भारताच्या विविधतेतील एकतेचे रूप दिसून आल्याचे त्यांनी सांगितलं वैयक्तिक आरोग्य व्यवस्थापनात भारताच्या नेतृत्वाची पुनर्पृष्ठी केली आणि आयुर्वेदाच्या निवारक आरोग्यसेवा व जीवनशैली व्यवस्थापनातील



महत्त्वाची भूमिका या अभियानामुळे अधोरेखित झाली आहे हा डेटा आधारीत दृष्टिकोन साध्य आधारित संशोधनासाठी महत्त्वपूर्ण ठरेल ज्यामुळे आयुर्वेद आणि आधुनिक वैदिक पद्धती यांच्यातील दरी कमी होऊन भारताच्या आरोग्य क्षेत्राच्या प्रगतीला नवे बळ उत्पन्न करून देईल असा आशावादी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केला

# विद्यार्थी मित्रांनो, विज्ञानाकडे वळा...

## संपादकीय लेख

_भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान परिषद आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. रामन इफेक्टचा शोध लागल्याने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या शोधाची घोषणा भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली होती. या शोधाबद्दल त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा आपल्या ज्ञानात भर घालणारा सदर संकलित लेख... संपादक.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.वसंतराव गोवारीकर सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण निर्माण करण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे. डॉ.वसंतराव गोवारीकरांच्या मनात आले की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही.रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे सन १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर जी तारीख निघाली ती २८ फेब्रुवारी ही होय.

डॉ.सी.व्ही. रमन यांचा जन्म तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली आणि शिक्षण चेन्नई येथे झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठात सन १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ.रमन हे काही काळ बंगलोरातही होते, १९४७ साली ते रमन संशोधन संस्थेचे संचालक झाले. त्यांचे दि.६ मे १९०७ रोजी लोकासुंदरी अम्मलबरोबर लग्न झाले होते. त्यांना चंद्रशेखर आणि रेडिओ-खगोलशास्त्रज्ञ राधाकृष्णन हे दोन पुत्र होते. डॉ.रमन हे चंद्रशेखर सुब्रह्मण्यन यांचे काका होते. सन १९८३मध्ये चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. हिंदू तमिळ ब्राह्मण पालकांच्या पोटी जन्मलेले रमन हा एक अनमोल मुलगा होता. त्याने सेंट अलॉयसियसच्या अँग्लो-इंडियन हायस्कूलमधून अनुक्रमे ११ आणि १३ वर्षांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १६ व्या वर्षी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात सन्मानाने त्यांनी मद्रास विद्यापीठात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. पदवीधर विद्यार्थी असताना सन १९०६ साली त्यांचा पहिला संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आला. पुढच्या वर्षी त्यांनी एमएची पदवी मिळवली. कोलकाता येथील इंडियन फायनान्स सर्व्हिसमध्ये असिस्टंट अकाउंटंट जनरल म्हणून रुजू झाले, तेव्हा ते १९ वर्षांचे होते. तेथे त्यांची इंडियन असोसिएशन फॉर द अप्लाइन्शन ऑफ सायन्स- आयएसएस या भारतातील पहिल्या संशोधन संस्थेशी ओळख झाली, ज्यामुळे त्यांना स्वतंत्र संशोधन करण्याची परवानगी मिळाली आणि ध्वनी आणि ऑप्टिक्समध्ये त्यांनी मोठे योगदान दिले. रमन यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. ऑक्टोबर १९७०च्या शेवटी रमण त्यांच्या प्रयोगशाळेत कोसळले; त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले आणि डॉक्टरांनी त्यांना चार दिवस जगण्यासाठी मुदत दिली. ते वाचले आणि काही दिवसांनी त्यांनी रुग्णालयात राहण्यास नकार दिला, कारण त्यांनी त्यांच्या अनुयायांनी वेढलेल्या त्यांच्या संस्थेच्या बागेमध्ये मरणे पसंत केले. रमनच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी त्यांनी आपल्या एका माजी विद्यार्थ्यास सांगितले, ङ्गङ्गअकादमीच्या नियतकालिकांना मरण येऊ देऊ नका, ते देशात विज्ञानाच्या गुणवत्तेचे संवेदनशील संकेतक आहेत.ङ्गङ्ग ती संध्याकाळ, रमन यांनी आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाशी भेट घेण्यात आणि त्यांच्याबरोबर संस्थेच्या व्यवस्थापनासंबंधी कार्यवाहीबद्दल त्यांच्याशी चर्चा करण्यात घालवली. दि.२१ नोव्हेंबर १९७०च्या रात्रीनंतर रमन यांचा दुसऱ्या दिवशी पहाटे नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाला. सन १९१७मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात आशुतोष मुखर्जी यांनी त्यांना भौतिकशास्त्राचे पहिले पालित प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. आपल्या पहिल्या युरोप दौऱ्यात भूमध्य समुद्र पाहून त्याला समुद्राच्या निळ्या रंगाचे वर्णन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी १९२६ मध्ये इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सची स्थापना केली. त्याने आणि कृष्णन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाश विखुरल्याची एक अभिनव घटना शोधून काढली, ज्याला त्यांनी सुधारित विखुरणे असे संबोधले, पण त्याला रामन परिणाम म्हणून ओळखले जाते. भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. रमन सन १९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये पहिले भारतीय संचालक बनले. तेथे त्यांनी त्याच वर्षी इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली. त्यांनी सन १९४८ साली रमन रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तेथे त्यांनी शेवटच्या काळात काम केले. त्यांच्या रमन परिणाम- प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग या शोधासाठी ते ओळखले जातात. सन १९३०चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रमन यांना मिळाले होते.

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे उद्दिष्ट असे की, लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन दरवर्षी साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि विज्ञान क्षेत्रात विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. देशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करण्यासाठी. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि त्यांना प्रेरित करणे आणि विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनासारखे कार्यक्रम वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकतात. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनमान अधिकाधिक सुखी करू शकतो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय आणि इतर विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमी, शाळा आणि महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था यासारख्या सर्व विज्ञान संस्थांमध्ये या दिवशी विविध वैज्ञानिक उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जातात. महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये भाषणे, निबंध, शास्त्रज्ञांचे लेखन, विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन, परिसंवाद आणि परिसंवाद इत्यादींचा समावेश होतो. विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात आले आहेत.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार


सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# मलकापुरात झाली मालमत्ता सर्वेक्षणाला सुरुवात...

**जनसंचलन/मलकापूर**

नगर परिषद कार्यक्षेत्रातील मालमत्तेचे सर्वेक्षण व मापनाचे काम सध्या सुरू असून, नागरी सुविधा सुधारण्यासाठी हे अत्यावश्यक आहे, असे नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी विठ्ठल भुसारी यांनी सांगितले. नागरिकांनी या कार्यात सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. मालमत्ता सर्वेक्षण मोहिमेची माहिती देण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने प्रसिद्धी पत्रक तसेच रिक्षांवरील लाऊडस्पीकरद्वारे जनजागृती सुरू केली आहे. यासाठी स्थापत्य कन्सल्टंट (इं) प्रा. लि. या संस्थेला जबाबदारी देण्यात आली आहे. सर्वेक्षणानंतर नमुना ४३, कर भरणा व त्यासंबंधित पावत्या ऑनलाइन उपलब्ध होतील, अशी माहिती मालमत्ता व कर अधिकारी नंदकिशोर आंधळे यांनी दिली. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी व कर आकारणीच्या पारदर्शकतेसाठी हे सर्वेक्षण महत्त्वाचे आहे. नागरिकांनी सहकार्य करून स्वतःच्या मालमत्तेची अचूक नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी जनजागृतीसाठी पुढाकार घ्यावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले. याबाबत नागरिकांना प्रेरित केले जात असून सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून होत आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पुण्यात बसमध्ये तरुणीवर अत्याचार...

**पुणे:** राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात तरुणीवर बलात्कार झाल्याची घटना घडली आहे. स्वारगेट एसटी आगाराच्या परिसरात उभ्या असलेल्या एका बंद शिवशाही बसमध्ये नेऊन आरोपी तरुणानं पीडितेवर बळजबरी केली. त्यानंतर तो तिथून फरार झाला.

पहाटे साडे पाचच्या सुमारास हा भयंकर प्रकार घडला. दत्तात्रय घाडे असं आरोपी तरुणाचं नाव आहे. त्याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. पहाटे साडे पाच वाजता २६ वर्षांची पीडित तरुणी पुण्यातून फलटणच्या दिशेने निघाली होती. स्वारगेट एसटी स्टँड परिसरात आल्यानंतर ती एका बाकड्यावर बसली होती. याच वेळी आरोपी त्या ठिकाणी आला. आरोपीनं पीडितेला विचारलं, ताई तू कुठे चालली आहेस?. त्यावर पीडितेनं सांगितलं मी फलटणला निघाली आहे. त्यावर आरोपी म्हणाला फलटणची बस तर तिकडे लागली आहेस. तू इथे काय करतेस? नंतर तरुणी म्हणाली साताऱ्याला जाणाऱ्या बस इथेच लागतात. त्यावर आरोपी म्हणाला, ती बस रात्रीची लेट झाली आहे. तू जा पटकन मी तुला बसवतो, असं म्हणून आरोपी दत्तात्रय गाडे हा तरुणीला शिवशाही बस क्रमांक ०६ ०३१९ मध्ये घेऊन गेला.गाडीमध्ये पूर्ण अंधार होता, त्यानंतर पीडितेला संशय आला.

हे पाहताच आरोपी गाडे पीडितेला म्हणाला रात्री उशीर झाला आहे. त्यामुळे प्रवासी झोपलेले असतील म्हणून लाईट बंद केले आहेत. तू वर चढ आणि टॉर्च लावून पाहा असं गोड बोलून आरोपी गाडे हा पीडितेला




बसमध्ये घेऊन गेला आणि पाठोपाठ तोही त्या गाडीमध्ये चढला. बसमध्ये चढताच गाडेने दरवाजा लावून घेतला आणि पीडितेसोबत अतिप्रसंग केला आणि पसार झाला.दत्तात्रय रामदास गाडे असं अत्याचार करणाऱ्या नराधमाचं पूर्ण नाव आहे. गाडे हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.

त्याच्यावर यापूर्वी शिक्रापूर आणि शिरुर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद आहे. सराईत गुन्हेगार असलेल्या गाडेला सोनसाखळी चोरीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये अटक झाली होती. तो जामिनीवर बाहेर असल्याची माहिती मिळत आहे. त्याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. सध्या पोलीस त्याच्या भावाची चौकशी करत आहेत.

## लग्नाचं वचन केवळ शारीरिक संबंधांच्या उद्देशानेच असेल तर...

### नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय...

**नागपूर :** केवळ शारिरिक संबंध ठेवण्यासाठीच पुरुषाने लग्नाचे आश्वासन दिले असेल व त्याचा उद्देश पीडितेला फसविण्याचाच असेल तर अशा लैंगिक संबंधांना पीडितेने दिलेल्या सहमतीला काही महत्व राहत नाही असे मत नोंदवित मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बलात्काराच्या आरोपातील एका दोषीची शिक्षा कायम ठेवली आहे. या दोषीला एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष देऊन तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप होता. तो सिद्ध झाल्याने न्या.उर्मिला जोशी-फाळके यांच्या खंडपीठाने सत्र न्यायालयाने या दोषीला सुनावलेली शिक्षा कायम ठेवण्याचा निर्णय दिला.

ही घटना २०१९ साली भंडारा शहरात घडली होती. पिडीत मुलगी शहरातील एका फळाच्या दुकानात काम करत होती. दोषी रुपचंद शेंडे हा देखील एक फळाचे ज्युस सेंटर चालवित असे. यादरम्यान दोघांची ओळख झाली. रुपचंदने मुलीला लग्नाचे आमिष देऊन तिच्याशी शारारिक संबंध प्रस्थापित केले. यावेळी पीडिता केवळ सोळा वर्षांची होती. या संबंधातून पीडित मुलगी गर्भवती राहिली. रुपचंदने तिला गर्भपाताच्या गोळ्या दिल्या, मात्र तरीदेखील मुलगी गर्भवती राहिली. मुलीने यानंतर अनेकदा आरोपीकडे लग्नाची मागणी केली, मात्र आरोपीने त्याकडे लक्ष दिले नाही. मुलीने यानंतर भंडारा पोलीस ठाण्यात बलात्काराची तक्रार दाखल केली भंडारा येथील विशेष न्यायालयाने पोक्सोसह इतर कलमांच्या अंतर्गत आरोपीला दहा वर्षांची शिक्षा ठोठावली होती. आरोपीने या शिक्षेच्या विरोधात उच्च न्यायालयात अपील दाखल केले. उच्च न्यायालयाने ही अपील फेटाळत आरोपीची शिक्षा कायम ठेवली. आरोपीचा सुरवातीपासून उद्देश मुलीसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित करणे हा होता.

आरोपीने लग्नाबाबत कधीही गांभीर्य दाखविले नाही. त्यामुळे मुलीच्या लैंगिक शोषणाचाच उद्देश असेल तर मग तिच्या सहमतीने संबंध प्रस्थापित केले हा युक्तिवाद मान्य केला जाऊ शकत नाही. याशिवाय मुलगी अल्पवयीन असल्याने तशीही तिची सहमती कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरता येत नाही, असेही न्यायालयाने निर्णयात स्पष्ट केले. आरोपीच्यावतीने ॲड.व्ही.बी.गवळी यांनी तर ॲड. मोहिनी शर्मा यांनी पिडीताच्यावतीने बाजू मांडली.

## डीजे लावून जावयाचा झुंबा डान्स, तक्रार केल्याचा राग, नागपुरात निवृत्त पोलीस उपनिरीक्षकाने सुपारी दिली अन्..

**नागपूर :** नागपूर सुधार प्रन्यासमध्ये तक्रार केल्याने धडा शिकवण्यासाठी निवृत्त पोलिस उपनिरीक्षकाने तिघांना हल्ल्याची सुपारी दिल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महावितरण्याच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावरील हल्ला प्रकरणाचा पर्दाफाश करीत सदर पोलिसांनी चौघांना अटक केल्यानंतर ही माहिती उघडकीस आली. राजाराम पांडुरंग ढोरे (वय ६२) रा.नागसेन सोसायटी, कल्पना टॉकीज मागे, मानकापूर, अब्दुल वसीम अब्दुल सलीम (वय ४१) रा. सदर, अनिल जेम्स चौरे (वय ३२) रा. निंबोनीनगर, जरीपटका व अनिकेत ऊर्फ निक्की दिलीप बहादुरे (वय २७) रा.मेकोसाबाग,अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. ढोरे हे शहर पोलिस दलाचे निवृत्त पीएसआय असून अन्य तिघे गुन्हेगार प्रवृत्तीचे आहेत. सुरेश प्रल्हाद सोनटक्के (वय ५६) रा. नागसेन सोसायटी, मानकापूर,असे जखमीचे नाव आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, २०१८ मध्ये सुरेश सोनटक्के हे महावितरणमधून निवृत्त झाले. त्यांच्या घरासमोरच ढोरे व त्यांचे जावई राहतात. ढोरे यांचे जावई रस्त्यावर अतिक्रमण करून झुंबा म्युझिक डान्सचे आयोजन करतात. डीजेच्या आवाजाने सोनटक्के त्रस्त झाले. याबाबत सोनटक्के यांनी ढोरे यांच्याकडे अनेकदा तक्रार केली. परंतु ढोरे यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे सोनटक्के यांनी नासुप्रमध्ये तक्रार दिली. या तक्रारीची सुनावणी सुरू आहे. तक्रार दिल्याने ढोरे संतापले. त्यांनी सोनटक्के यांना धडा शिकविण्याचा निर्णय घेतला. यासाठी अब्दुल व अन्य तिघांना सोनटक्के यांच्यावर हल्ला करण्यासाठी २० हजार रुपयांमध्ये सुपारी दिली. दरम्यान, १७ फेब्रुवारीला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन तक्रार देण्यासाठी ते मोटारसायकलने रवीभवन येथे जायला निघाले. प्रोव्हिडन्स स्कूल परिसरात दोघांनी त्यांना अडविले. बांबूने त्यांच्यावर हल्ला केला व पसार झाले. सोनटक्के यांनी सदर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.पोलिस उपायुक्त राहुल मदने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक मनीष ठाकरे, उपनिरीक्षक नीलेश घोगरे, हेडकॉन्स्टेबल मिलिंद भगत, सतीश गोहत्रे, आशिष बहाळ, सचिन कावळे, पंकज तिवारी, बालाजी गुट्टे यांनी सीसीटीव्हीच्या आधारे हल्लेखोरांचा शोध घेतला.

## हृदयविकाराच्या झटक्याने महिनाभरात दुसऱ्या कुलीचा मृत्यू, कुटुंबावर शोककळा...

**नागपूर :** हृदयविकाराने मृत्यू होण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. जानेवारी महिन्यात रेल्वे स्थानकावर एका कुलीचा हृदयविकाराने मृत्यू झाला होता. मंगळवारी आणखी एका कुलीचा प्लॅटफॉर्मवरच हृदयविकाराने मृत्यू झाल्याची घटना घडली. राहुल टेंभुर्णे (वय ४४) असे मंगळवारी मृत्यू झालेल्या कुलीचे नाव आहे. सकाळी पावणे नऊच्या सुमारास सिकंदराबाद-रायपूर ही गाडी प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर आली. त्यामुळे नेहमीप्रमाणे राहुलने तिकडे धाव घेतली. मात्र त्याला काहीच काम मिळाले नाही. त्यामुळे तो परतत असताना जागीच कोसळला. आजुबाजूचे कुली आणि सफाई कर्मचाऱ्यांनी त्याला उठविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याला मेयो रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पाटणकर चौक येथे भाड्याच्या घरात राहणाऱ्या राहुलच्या मागे पत्नी व दोन लहान मुली आहेत.

# राज्यातील ५०० डॉक्टरांच्या नियुक्त्या रद्द; अनिवार्य कागदपत्रे सादर न केल्याने सरकारची मोठी कारवाई...

**मुंबई :** शैक्षणिक अर्हतेसंबंधी तसेच अन्य अनिवार्य कागदपत्रे सादर न केल्यामुळे, पाचशेहून अधिक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या (गट अ) नियुक्त्या सरकारने रद्द केल्या आहेत. ३१ जानेवारी २०२४रोजी झालेल्या भरतीप्रक्रियेद्वारे स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञांच्या रिक्त जागा भरण्यात आल्या होत्या. २० जाने २०२४ रोजी त्यांना नियुक्तीचे आदेश मिळाले. मात्र हे उमेदवार दिलेल्या मुदतीमध्ये रुजू झाले नाहीत. यातील काही जणांनी खासगी प्रॅक्टीस सुरू केल्याची शक्यता सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. ग्रामीण तसेच सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आजही रिक्त पदांचा प्रश्न मोठा आहे. आदिवासी तसेच ग्रामीण भागांमध्ये डॉक्टरांची अनेक पदे रिक्त आहेत. ती भरण्यात आलेली नाहीत. त्यामुळे रुग्णसेवेवरील ताण वाढत आहे.



अनेक ठिकाणी आरोग्य केंद्रे असली, तरी प्रत्यक्षात डॉक्टर वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे रिक्त पदांवर भरतीचा निर्णय घेण्यात आला आहे.सरकारने सार्वजनिक रुग्णालयांतील विशेषज्ज्ञांची कमतरता भरून काढण्यासाठी ३१ जानेवारी २०२४ रोजी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या (गट अ) भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली होती. निवड झालेल्या उमेदवारांना २० जून २०२४रोजी नियुक्तीचे आदेश देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही ते उपस्थित राहिले नाहीत. ग्रामीण, आदिवासी भागामध्ये जाऊन प्रॅक्टिस करण्यासाठी डॉक्टरांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही. सार्वजनिक आरोग्य सेवेमधील त्रुटींमुळे कामाचा ताण वाढत आहे.

खासगी रुग्णालयांच्या तुलनेत वेतनही कमी मिळत असल्याने, अनेक डॉक्टर सार्वजनिक वैद्यकीय सेवेमध्ये रुजू होण्यास उत्सुक नसतात, याकडे तज्ज्ञांनी लक्ष वेधले. नियुक्त्या मोठ्या प्रमाणावर रद्द झाल्यामुळे, आधीच अपुरे कर्मचारी असलेल्या जिल्हा रुग्णालयांमध्ये रुग्णसेवेवर परिणाम होण्याची चिंता व्यक्त होत आहे. आपत्कालीन विभाग, स्त्रीरोग आणि भूलशास्त्र या महत्त्वाच्या विभागांचे कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी सरकार प्रतीक्षा यादीतील उमेदवारांमार्फत रिक्त जागा भरण्याचा विचार करत आहे. ज्ञ्या जागा रिक्त ठेवणे हा पर्याय नाही. भरती प्रक्रिया गतिमान झाली पाहिजे. अन्यथा हीच परिस्थिती पुन्हा निर्माण होईल,फ असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# स्कुटीवर बसलेला, अचानक मागून दोघं आले आणि एकामागे एक वार; सकाळी भररस्त्यात थरार...

**नांदेड :** नांदेडमध्ये गुन्हेगारीने डोकं वर काढलं आहे. चोरी, हाणामारी, गोळीबार आणि हत्येसारख्या घटना सातत्याने घडत आहेत. बुधवारी देखील नांदेडमध्ये भयंकर घटना समोर आली. सकाळच्या सुमारास दोन अज्ञात मारेकऱ्यांनी स्कुटीवर थांबलेल्या एका तरुणावर चाकूने वार करुन त्याची हत्या केली. हल्लेखोरांनी पाठलाग करत तरुणाच्या मानेवर, पोटात आणि पाठीवर तब्बल आठ ते दहा खंजर खुपसले. रक्तबंबाळ झालेल्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. अमोल भुजबळ असं मृत तरुणाचं नाव आहे. अमोल भुजबळ हा शहरातील खोब्रागडे नगर येथील रहिवासी असून तो एका खाजगी रुग्णालयात सुरक्षा रक्षक म्हणून काम करत होता. बुधवारी सकाळी सात वाजताच्या सुमारास तो स्कुटीवरून गणेशनगर भागातील एका दुकानावर सामान घेण्यासाठी आला होता. तो स्कुटीवर बसलेला होता आणि दुकानदार त्याला सामान देत होता. तो स्कुटीवरुन बसलेला




असताना, काही वेळात पाठीमागून काळ्या कपड्याने तोंड झाकलेले दोघे जण धावत आले आणि अमोल बेसावध असताना याच्या मानेवर आणि पाठीवर खंजरने वार करण्यास सुरवात केली.हल्लेखोरांनी चाकू मारण्यास सुरवात केल्यानंतर अमोल तेथून पळ काढू लागला. पण हल्लेखोरांनी त्याचा पाठलाग करत जवळपास आठ ते दहा वार जिथे मिळेल तिथे त्याच्या शरीरावर केले. यात अमोलचा जागीच मृत्यू झाला. अमोल भयंकर हल्ल्यानंतर तसाच रक्ताच्या थोराळ्यात रस्त्यावर पडलेल्या अवस्थेत होता. दोघांपैकी एकाने डोक्यावर हेल्मेट, तर दुसऱ्या एकाने काळा रुमाल तोंडाला बांधला होता. सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर फारशी गर्दी नव्हती. त्यामुळे हल्लेखोरांनी सकाळीच त्याच्यावर बेसावधपणे भीषण वार केले.दिवसाढवळ्या घडलेल्या घटनेने गणेश नगर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेनंतर हल्लेखोर पसार झाले. मात्र घटनेचा थरार सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव, पोलीस उपाधीक्षक सुशीलकुमार नायक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्यासह शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जुन्या वादातून ही हत्येची घटना घडल्याची माहिती आहे. फरार हल्लेखोरांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

# महाशिवरात्री ठरली काळरात्र; सहा जणांचा नदीत बुडून मृत्यू



**चंद्रपूर:** देशात महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. त्यातच चंद्रपूर जिल्ह्यावर मात्र शोककळा पसरली आहे. दोन वेगवेगळ्या घटनेत तीन सख्ख्या बहिणींसह तीन तरुणांचा बुडून मृत्यू झाला आहे. आंघोळीसाठी नदी पात्रता उतरले असता पाण्याचा अंदाज न आल्याने या घटना घडल्याची माहिती आहे. प्रशासनकडून सहा जणांचा शोध घेतला जात आहे. महाशिवरात्रीनिमित्त नदीवर अंघोळीसाठी गेलेले तीन युवक नदीच्या पात्रात बुडाल्याची घटना राजुरा तालुक्यात घडली आहे. या तिघांचाही सध्या शोध सुरू आहे. राजुरा तालुक्यातील चुनाळा येथील हे युवक असून ते शेजारच्या लोकांसोबत जवळच्या वर्धा नदीवर अंघोळीसाठी गेले होते. तुषार शालिक आत्राम (वय १७), मंगेश बंडू चणकापुरे ( वय २०), अनिकेत शंकर कोडापे (वय १८) अशी बुडालेल्या युवकांची नावे आहेत. खोल पाण्याचा अंदाज न आल्याने हे तिघेही बुडाल्याचे सांगण्यात येत आहे. सोबतच्या काही लोकांनी त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र ते शक्य झाले नाही. आता चंद्रपूर येथून बचाव पथक पाठवण्यात आले असून, शोध घेतला जात आहे.चंद्रपूर - गडचिरोली राष्ट्रीय महामार्गावरील व्याहाळजवळ असलेल्या वैनगंगा नदीच्या पुलाखाली आंघोळीसाठी गेलेल्या तीन सख्ख्या बहीणींना जलसमाधी मिळाली आहे. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. चंद्रपुरातील बाबुपेठ परिसरातील रहिवाशी असलेले मंडल कुटुंबीय आंघोळीसाठी वैनगंगा नदीच्या पुलाखाली गेले होते. त्यात आंघोळीसाठी गेलेल्या प्रतीमा प्रकाश मंडल (२३), कविता प्रकाश मंडल (२२), लीपीका प्रकाश मंडल (१८) यांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्या खोल पाण्यात शिरल्या. सोबत त्यांचा लहान भाऊ व काकू सुध्दा होती. हे पाचही जण बुडत असताना त्यांनी आरडाओरड केली. त्यांचा सोबत सोबत असलेल्या काकाने प्रसंगावधान राखुन लहान मुलाला बाहेर काढले. सोबत असलेली महिला पाण्याच्या प्रवाहाने वाहत जाताना नदीतील दगडाचा आधार तिला मिळाला आणि ती वाचली. घटनेची माहिती आपदा दलाच्या मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठुन सुखरूप बाहेर काढले आहे. बुडालेल्या तिघांचा शोध सुरु आहे.

# नवरा गेला अन् प्रियकरही; पतीला तलावात फेकताना बॉयफ्रेण्डही पडला, अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट....





**सोलापूर:** पांगरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खुनाला वाचा फुटली आहे. पांगरी पोलिसांनी सुतावरुन स्वर्ग गाठला. पोलिसांनी विवाहित प्रेयसीला बेड्या ठोकल्या आहेत. नवरा गेला, प्रियकरही गेला आणि स्वतःला बिन भाड्याच्या खोलीत सरकारी पाहुणचार घेण्यासाठी जेलची हवा खाणं प्रेयसीच्या नशिबी आलं. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील ढाळे पिंपळगाव तलावातील दोघांच्या मृत्यू प्रकरणातील सत्यता पोलिसांच्या तपासात पुढे आली आहे. प्रेयसीच्या पतीला उचलून तलावात फेकताना त्याने त्याचा गळा धरला आणि प्रियकरही पाण्यात बुडून मरण पावल्याची कबुली साक्षीदाराने पोलिसांना दिली आहे.याप्रकरणी पांगरी पोलिसांनी मयत गणेश अनिल सपाटे (वय २६, रा. अलीपूर रोड, बार्शी) आणि रूपाली शंकर पटाडे (वय ३५) या दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच महिलेला अटक केली आहे. महागाव (ता. बार्शी) येथील ढाळे पिंपळगाव तलावात पुलावरून पडून दोघांचा मृत्यू झाल्याची घटना पुढे आली होती. त्या दोघांचा मृत्यू संशयास्पद होता. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून सत्यता समोर आणली आहे.रुपाली (वय ३५) आणि शंकर पटाडे (वय ४०) हे दोघे नवरा-बायको होते. दोघांचा प्रेम विवाह झाला होता. बार्शी शहरातील यशवंत नगर येथे हे दोघे वास्तव्यास होते. या दोघांच्या संसाराच्या वेलीवर दोन फुलं उमलेली. शंकर हा वाहन चालक होता. तर रुपाली ही घरकाम करत होती. सगळं काही चांगलं चाललं होतं. याच टप्प्यावर बार्शीमधील अलीपूर रस्ता परिसरातील २६ वर्षाचा गणेश अनिल सपाटे हा रुपालीच्या आयुष्यात आला होता. त्याचं आपल्या पत्नीच्या आयुष्यात येणं हे शंकर पटाडे यांना न आवडलेला. नवरा शंकर यांने रुपाली आणि गणेश यांच्या प्रेमाला खूप विरोध केलेला. पती-पत्नीत सतत भांडणं होत होती. प्रियकर गणेशला सोडून दे, असं शंकर वारंवार सांगत होता.रुपाली आणि गणेश यांचं प्रेम अधिकच फुलत गेले होतं. पती शंकर याचे प्रेम प्रकरणात अडथळा करणं है रुपाली आणि गणेश यांना नेहमी खटकत होतं. त्यातून वा दोघांनी शंकरचा कायमचा काटा काढण्याचं ठरविलेला होता. यासाठी रुपाली आणि गणेश दोघांनी प्लॅन आखला होता. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रियकर गणेश यांने शंकर पटाडे याचा कायमचा काटा काढण्यासाठी त्याला याच तालुक्यातील बावी शिवारातील एका हॉटेलमध्ये दारू पार्टीसाठी घेऊन गेला होता. गणेश यांनी सोबतीला आपले दोघे मित्रपण मदतीला घेतलेले होते.शंकरचा करेक्ट कार्यक्रम करण्याचं ठरवून सर्वांनी दारू ढोसली होती. मयत शंकर देखील फुल्ल प्यायला होता. गणेश सपाटे हा आपल्या मित्रासह शंकर याला सोबत येऊन महागाव (ता. बार्शी) येथील तळ्यावर गेला. मध्यरात्रीच्या सुमारास त्याने पुलावर थांबून शंकरला तलावातील पाण्यात ढकलण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान, तलावात पडताना शंकर पटाडे याने गणेशला मिठी मारली. त्यामुळे दोघेही तलावातील पाण्यात पडले. दोघांनाही बाहेर येणं अशक्य झालं. नवरा शंकर आणि प्रियकर गणेश दोयांचाही शेवट तलावात झाला होता.बार्शी तालुक्यातील पांगरी पोलिसांनी या दुहेरी खुनाचा छडा लावला आहे. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पडला प्रकार एकाने पाहिला होता. याची माहिती संबंधितानं पांगरी पोलिसांना कळवली. त्याप्रमाणे पोलिसांनी तपास केला असता खुनाला वाचा फुटली. त्यानंतर पांगरी पोलीस ठाण्यातील हेड कॉन्स्टेबल श्रीहरी योडके यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली. रुपाली आणि शंकर यांना दोन मुलं आहेत. रुपाली हिच्या स्वैराचार वागण्यातून सोन्याचा संसार उध्वस्त झाला. या मुलांचा पिता कायमचा गेला. पित्याचा मोठा आधार गेला, तर आता वडिलांच्या खुनाच्या प्रकरणात आई तुरुंगात आहे. आईचा पण आधार गेल्याने दोन मुलं पोरकी झाल्याने बार्शीत हळहळ व्यक्त होत आहे.

# पत्नीवरील संशयातून वाद आणि पतीचं भयंकर कृत्य; ५ महिन्यांची लेक पोरकी झाली, दोन वर्षाच्या लग्नाचा भीषण शेवट...

**नवी दिल्ली :** देशभरात हत्येच्या घटनांचं प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलं आहे. अशीच एक भीषण घटना समोर आली असून पतीने पत्नीची निर्घुण हत्या केली आहे. या घटनेनंतर पतीला ताब्यात घेण्यात आलं असून परिसरात या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. भयंकर बाब म्हणजे पतीने आपल्या पाच महिन्याच्या मुलीसमोरचं तिच्या आईला संपवल्याने चिमुकली पोरकी झाली आहे.




मंगळवारी सायंकाळी पाच वाजता एक तरुण पाच महिन्याच्या लेकीसह हर्ष विहार पोलीस स्थानकात पोहोचला. तरुणाने स्वत: त्याने पत्नीची हत्या केल्याचं पोलीस स्थानकात येत सांगितलं. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेत नंतर घटनास्थळी घेऊन गेले. तिथे महिला मृतावस्थेत आढळली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० वर्षीय रश्मी आपल्या आई आणि पाच महिन्यांच्या मुलीसोबत नंद नगरी इथे राहते. २० वर्षीय रश्मीचं लग्न प्रताप नगर येथील २४ वर्षीय अमनशी नोव्हेंबर २०२३ मध्ये लग्न झालं होतं. लग्नानंतर काही दिवसांतच दोघांमध्ये वाद होऊ लागले. लग्नापासूनच सतत अमनला त्याच्या पत्नीचं अफेअर असल्याचा संशय होता. लग्नानंतर काही महिन्यातच रश्मीला अमनशी घटस्फोट घ्यायचा होता.

दोघांमधील प्रकरण न्यायालयातही सुरू होतं. अमन तो नवी दिल्लीतील चांदनी चौकातील एका कपड्याच्या दुकानात सेल्समन म्हणून काम करतो.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अमन नंद नगरीमध्ये मंगळवारी दुपारी २ वाजता त्याच्या पत्नीला भेटण्यासाठी गेला होता. पण त्यावेळी रश्मी घरी नव्हती. ती घरी आल्यानंतर दोघांमध्ये मोठा वाद झाला. वाद एवढा टोकाला गेला की दोघांमध्ये मारहाण झाली. त्याच भांडणाच्या रागात अमनने पाच महिन्यांच्या मुलीसमोरच पत्नी रश्मीची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तो घटनास्थळावरुन मुलीला घेऊन फरार झाला. मंगळवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अमन पोलीस स्थानकात गेला आणि आपला गुन्हा कबूल केला. सध्या याप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# कुलदीपला कठीण काळात रोहितचा मिळाला पाठिंबा, कमबॅकमागे हिटमॅनचा हात; करिअर वाचवण्यात मोठी भूमिका...



**मुंबई:** पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये कुलदीप यादव हा भारतीय क्रिकेट संघाचा सर्वोत्तम शस्त्र आहे. तो बऱ्याच काळापासून एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये टीम इंडियाचा सर्वात विश्वासार्ह फिरकी गोलंदाज आहे. अलिकडेच झालेल्या दुखापतीमुळे कुलदीप यादवच्या कारकिर्दीत अडचणी निर्माण झाल्या आहेत. दुसरीकडे, वरुण चक्रवर्तीने आपल्या चमकदार कामगिरीने हळूहळू संघात आपले स्थान पक्के केले. कर्णधार रोहित शर्माच्या पाठिंब्यामुळे कुलदीप यादवने पुनरागमन केले. आता कुलदीपने रोहितबाबत मोठे विधान केले आहे. कुलदीप यादवने एक मोठा खुलासा केला आणि सांगितले की, जेव्हा तो जखमी झाला तेव्हा कर्णधार रोहित शर्माने एनसीएमध्ये जाऊन त्याला पाठिंबा दिला. मला रोहित खूप आवडतो. कठीण काळात त्याने मला खूप साथ दिली. जेव्हा मी जखमी झालो होतो तेव्हा रोहित एनसीएमध्ये प्रशिक्षणासाठी आला होता. त्यावेळी तो मला म्हणाला, तू हे कसे करशील हे मला माहित नाही पण जेव्हा तू पुनरागमन करशील तेव्हा मला गोलंदाजीमध्ये मी मागितलेले बदल पहायला आवडतील.कुलदीप पुढे म्हणाला की, रोहित भाईंनी माझ्या गोलंदाजीबद्दल जे काही सांगितले, ते मी बदलले. आता रोहित भाई माझ्याशी फलंदाजीबद्दलही बोलतात. आता मी फलंदाजीचा सरावही करत आहे. रोहित कुलदीपवर खूप विश्वास ठेवतो. रोहित एकदिवसीय सामन्यांमध्ये कुलदीप यादवला डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी करायला लावतो. २०१५ पासून, कुलदीपने ४० ते ४५ षटकांच्या ४३ डावांमध्ये २५ विकेट्स घेतल्या आहेत. सध्या, शेवटच्या १० षटकांमध्ये आउटफिल्डमध्ये पाच क्षेत्ररक्षकांना परवानगी आहे. कुलदीप म्हणाला की, त्याला डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी करण्याचे आव्हान आवडते. शेवटच्या १० षटकांमध्ये गोलंदाजी करण्यासाठी मी पहिली पसंती बनू शकलो. कर्णधारालाही असे वाटले की जेव्हा तुमच्याकडे विविधता असते तेव्हा फिरकीपटूंविरुद्ध मोठे शॉट खेळणे खूप कठीण असते. (दुबईतील) खेळपट्टी संथ होती आणि ती माझ्यासाठी चांगली होती. मी वेग आणि चुकीचा किंवा टॉप-स्पिन यात मिसळण्याचा प्रयत्न करत होतो.

# छावाची डरकाळी आता दक्षिणेतही! निर्मात्यांचा मोठा निर्णय

## नवीन रीलिज डेट आली समोर...



**मुंबई:** विकी कौशल, रश्मिका मंदाना, अक्षय खन्ना आणि गाजलेल्या मराठी कलाकारांच्या छावा या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः ताबा मिळवला आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित छावा सिनेमा १४ फेब्रुवारी रोजी रीलिज झाला आणि २५ फेब्रुवारीपर्यंत अवघ्या १२ दिवसात या चित्रपटाची कमाई ३७२.८४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. बुधवारी, २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त असलेल्या सुट्टीचा फायदा या चित्रपटाला होऊ शकतो. या दिवशीच ४०० कोटींचा आकडा पार होईल असा अंदाज वर्तवला जातो आहे. बॉलिवूड बॉक्स ऑफिसवर छावाची विजयी घोडदौड सुरू असतानाच निर्मात्यांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. मॅडॉक फिल्म्स या बॅनरखाली दिनेश विजान यांनी छावाची निर्मिती केली आहे. अलिकडेच मॅडॉकच्या अधिकृत पेजवरुन सिनेमाविषयीचे एक महत्त्वाचे अपडेट देण्यात आले. त्यानुसार, हा सिनेमा आता तेलुगू भाषेतही प्रदर्शित केला जाणार आहे. तेलुगूमध्ये हा सिनेमा रीलिज केला जावा अशी मागणी वाढल्याने निर्मात्यांनी असा निर्णय घेतला. शेअर केलेल्या पोस्टमध्ये असे लिहिण्यात आले की, लोकांच्या मागणीनुसार, भारताच्या धाडसी पुत्राची महाकथा- छावा आता तेलगूमध्ये गर्जना करण्यासाठी सज्ज आहे. विकीनेही त्याच्या इन्स्टाग्रामवर ही पोस्ट शेअर केली.निर्मात्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ मार्च रोजी छावा हा सिनेमा तेलुगू भाषेमध्ये प्रदर्शित होणार आहे. दाक्षिणात्य सिनेविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री रश्मिका हिने छावा सिनेमात महाराणी येसूबाईंची भूमिका साकारली आहे. दक्षिणेत तिचा मोठा चाहतावर्ग असल्याने तेलुगू रीलिजनंतर छावाच्या कमाईत आणखी वाढ होऊ शकते. दरम्यान तेलुगूमध्ये या सिनेमाचे वितरण टॉलिवूडमधील लोकप्रिय प्रोडक्शन हाऊस गीता आर्ट्सकडून केले जाणार आहे. आंध्रप्रदेश आणि तेलंगणामध्ये या सिनेमाचे वितरण केले जाईल. छत्रपती संभाजी महाराज यांची शौर्यगाथा दक्षिणेपर्यंत प्रादेशिक भाषेमध्ये पोहोचणार असल्याने आनंद व्यक्त केला जातो आहे.छावा चित्रपटात विनीत कुमार सिंग, आशुतोष राणा, दिव्या दत्ता या कलाकारांच्या भूमिकाही गाजल्या. मराठी कलाकारांची तर एक मोठी फौज या चित्रपटात पाहायला मिळाली. संतोष जुवेकर, सारंग साठ्ये, सुव्रत जोशी, शुभंकर एकबोटे, आशिष पाथोडे, मनोज कोल्हटकर, किरण करमरकर, आस्ताद काळे, नीलकांती पाटेकर या मराठी कलाकारांनी छावा चित्रपट गाजवला आहे.

# त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या कार्यक्रमात प्राजक्ता माळी नृत्य सादर करणार नाही



**मुंबई:** महाशिवरात्रीनिमित्त त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टनं आयोजित केलेल्या महाशिवरात्र उत्सवात अभिनेत्री प्राजक्ता माळी तिची कला सादर करणार नाहीये. प्राजक्ताचा ङ्गशिवार्पणमस्तुफ हा नृत्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. मात्र या कार्यक्रमाला माजी विश्वस्तांनी विरोध केला होता. यावर तिनं स्पष्टीकरणही दिलं होतं. यानंतर सर्व कार्यक्रम नियोजनानुसारच होणार असल्याचंही ट्रस्टकडून सांगण्यात आलं होतं. आता स्वत: प्राजक्ता माळीनं हा कार्यक्रम न करण्याचा निर्णय घेतला आहे. या कार्यक्रमाला प्रसिद्धी न देण्याचं ठरवलं होतं. मात्र काल या कार्यक्रमाची नको त्या कारणामुळं चर्चा झाली. त्यामुळं कार्यक्रमाची मोठी प्रसिद्धी झाल्यानं तिथं आता गर्दी होण्याची शक्यता आहे, या सुरक्षेच्या कारणास्तव मी यासोहळ्यात नृत्यकला सादर करणार नसल्याचं तिनं स्पष्ट केलं आहे. मंदिराच्या प्रांगणाचं क्षेत्रफळ पाहता किती जणं बसू शकतात, याचा विचार करूनच या कार्यक्रमाला प्रसिद्धी दिली नव्हती, आता अवास्तव गर्दीची भीती, काळजी प्रशासनाला वाटतेय.त्यामुळं मी माझ्या कुटुंबियांशी बोलून मी हा निर्णय घेते की, कमिटमेंट आहे म्हणून तो कार्यक्रम सादर होईल, पण माझ्या शिवाय. अर्थातच यानं माझ्या आनंदावर विरजण पडणार आहे, परंतू वैयक्तिक सुखापेक्षा प्रशासनावर अतिरिक्त ताण येऊ नये, ही बाब मला जास्त महत्त्वाची वाटते आणि मोठी वाटते. त्यामुळं सर्वस्वी हा माझा निर्णय आहे. अर्थातच जिथे भाव असतो तिथे देव असतो. यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मी कुठेही बसून शिवाची आराधना केली तरी ती शिवार्यंत ती पोहोचणारच आहे, असंही प्राजक्तानं म्हटलं आहे.प्राजक्ताच्या ङ्गशिवार्पणमस्तुफ हा नृत्याच्या कार्यक्रमाला माजी विश्वस्त ललिता शिंदे यांनी आक्षेप घेतला होता. या वादाच्या संदर्भात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या छत्रपती संभाजीनगर मंडलाच्या अधीक्षकांनीही ट्रस्टच्या अध्यक्षांना पत्र देऊन अशा प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याची अनुमती घेणं आवश्यक असल्याचे म्हटलं होतं. अशा प्रकारे विनापरवानगी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणं हे एएमएएसआर कायदा, १९५८ व त्याचे नियम,१९५९ चं उल्लंघन असल्याचे पत्रात नमूद होतं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जलसंधारण कामाची माहिती देण्यास विलंब भोवणार

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

मृद व जलसंधारण विभागामार्फत पूर्णत्वास गेलेल्या कामा संदर्भातील माहिती दक्षता व गुण नियंत्रण पथकास देण्यास होणारा विलंब आता व जलसंधारण विभागातील कार्यालय प्रमुखाला भोवणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिव यांनी नुकताच जारी केलेल्या नवीन अध्यादेशा द्वारे कोणत्याही वाजवी कारणाशिवाय दक्षता पथकांना माहिती तात्काळ पंधरा दिवसात उपलब्ध करून देणे बंधनकारक ठरविण्यात आले आहे. अन्यथा संबंधित कार्यालय प्रमुखावर शिस्तभंगाच्या कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. शासनाच्या या अध्यादेशामुळे मृद व जलसंधारण विभागातील भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र राज्यात मृद व जलसंधारण विभागाकडून कार्यान्वयेत होणाऱ्या योजना कामांशी संबंधित शासनास प्राप्त झालेल्या तक्रारी या कार्यक्षेत्रानुसार प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी, प्रादेशिक दक्षता व गुण नियंत्रण पथका कडे चौकशीसाठी पाठविण्यात येतात. मात्र सदर तक्रारींच्या चौकशीसाठी व कामांच्या तपासणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, अभिलेख संबंधित क्षेत्रीय विभागाकडून कुठल्याही वाजवी कारणाशिवाय दक्षता पथकांना तात्काळ आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून दिली जात नाही. परिणामी प्रशासकीय कामामध्ये बाधा निर्माण होऊन शासनाच्या कोट्यावधींचा निधीतुन होणाऱ्या विकास कामात पारदर्शकता न येता भ्रष्टाचारा वाव मिळतो, याचबरोबर कामासंदर्भात करण्यात आलेल्या तक्रारींना संबंधित विभागामार्फत वर्षानुवर्षे न्याय मिळत नाही. दरम्यान मृद व जलसंधारण सिंदखेडराजा उपविभागात मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेअंतर्गत पाझर तलावाच्या बनावट दुरुस्ती कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याबाबत महाराष्ट्र शासन युवा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी अमरावती विभागातील मृद व जलसंधारण विभागा विरुद्ध मुद्देनिहाय तक्रार शासनाकडे दाखल केली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिव शुभांगी पोटे यांनी २० फेब्रुवारी २०२५ रोजी शासन परिपत्रक क्रमांक आढावा २०२४/प्र.क्र.२८/ जल -१६ नुसार अध्यदेश जारी केला आहे. या अध्यदेशानुसार मृद व जलसंधारण विभागाअंतर्गत चौकशी तपासणीशी संबंधित अभिलेख विहित वेळेत उपलब्ध करून न देणाऱ्या संबंधित क्षेत्रीय कार्यालय प्रमुखाविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ मधील नियम १० नुसार शिस्तभंग विषयक कारवाई चा प्रस्ताव संबंधित दक्षता पथकांने शासनास सादर करावा. शासन स्तरावरून चौकशीसाठी प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित दक्षता पथकांनी चौकशी करून ३० दिवसाच्या आत, अथवा तक्रार गंभीर असल्यास १५ दिवसाच्या आत प्राथमिक चौकशी अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश दिले आहे. याचबरोबर ज्या प्रकरणांमध्ये प्रारूप दोषारोपपत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असतील अशा प्रकरणांमध्ये १५ दिवसांच्या आत पूरक कागदपत्रांसह प्रारूप दोषारोप पत्र शासनास सादर करावीत, विहित वेळेत प्रारूप दोषारोप पत्र शासनास सादर न करणाऱ्या सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील अधिनियमानुसार शासन स्तरावर शिस्तभग विषयी कारवाई सुरू करण्यात येईल. अशा स्वरूपाचा अध्यादेश शासनाने जारी केला आहे. शासनाच्या या नवीन अध्यादेशामुळे ग्रामविकास व जलसंधारण विभागाअंतर्गत विकास कामाच्या तक्रारीच्या अनुषंगाने आवश्यक माहिती दक्षता व गुण नियंत्रण अधिकाऱ्यास उपलब्ध करून देण्यासाठी होणारा विलंब मृद व जलसंधारण विभागातील कार्यालय प्रमुखाला भोवणार आहे. याचबरोबर मृद व जलसंधारण विभागातील भ्रष्टाचाराला काही प्रमाणात का होईना आळा बसणार आहे.

✻ प्रशासकीय कामा संदर्भात झालेल्या तक्रारी ची दखल घेत प्रशासनामार्फत वेळोवेळी सुधारणा केल्या जात असतात, मात्र झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्राची पूर्तता करण्यास विलंब होत असल्याने शासनाने अध्यादेश काढल्याचा प्रकार बहुदा पहावयास मिळत नाही. मृद व जलसंधारण विभागात पाझर तलावांच्या बनावट दुरुस्तीच्या माध्यमाने झालेल्या भ्रष्टाचाराची शासनाने नव्याने अध्यादेश काढून दखल घेतली आहे.

# राजे संभाजी नगर परिसरातील शिवमंदिर पोलीस हेडक्वार्टर येथे युवानेते मृत्युंजय गायकवाड यांचे हस्ते महाआरती संपन्न...!



**जनसंचलन/बुलढाणा**

आज दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर बुलढाणा शहरातील राजे संभाजीनगर परिसरातील पोलीस हेडक्वार्टर परिसरातील शिवमंदिर येथे बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांचे सुपुत्र महाराष्ट्र राज्य युवासेना कार्यकारणी सदस्य युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड यांच्याहस्ते भगवान महादेवाची महाआरती संपन्न झाली. यावेळी त्या ठिकाणी महाकाल ग्रुप मित्र मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांच्यासह परिसरातील नागरिक भाविक भक्त माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रीय आरोग्य मंत्र्याचे स्वीय सहाय्यक राजू भाऊ भोर ठरले खरे आरोग्यदूत

**जनसंचलन/ बुलढाणा**



हिराबाई चव्हाण रा.कुऱ्हा वय ४९ यांना दि १७/०२/२५ रोजी प्यारालीस मुळे मेंदूतील १० नस चॉकअप झाली. नस चॉकअप झाल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना इमर्जन्सी ऑपरेशन करण्यासाठी सांगितले ऑपरेशनचा खर्च टोटल अडीच लाख रुपये त्यांना सांगण्यात आला पेशंटची परिस्थिती हलाकीची असल्याकारणाने ऑपरेशन साठी येणारा एवढा खर्च त्यांच्या बजेटच्या वरती होता त्यांनी विजय मालाणी यांच्यामार्फत आरोग्यदूत दिपक नाईक यांच्याशी संपर्क साधला असता अचानक आरोग्यदूत दिपक नाईक यांच्यासोबत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव साहेब भूमिपुत्र वैद्यकीय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख राजूभाऊ भोर हे सोबत होते दिपक भाऊंनी त्यांना हिराबाई चव्हाण या पेशंट विषयी पूर्ण सविस्तर माहिती दिली राजू भाऊंनी लगेच संभाजीनगर येथे दोन तीन हॉस्पिटल ला फोनवरती कॉन्टॅक्ट केला असता हा पेशंट कोणत्याही योजनेमध्ये बसणार नाही असे सांगण्यात आले तरीपण राजू भाऊ यांनी हार मानली नाही त्यांनी त्यांच्या लेव्हल वरती खूप काही प्रयत्न करून शेवटी एका हॉस्पिटलमध्ये त्यांच्या ओळखीमुळे की तुम्ही पहिले यां पेशंट च ऑपरेशन इमर्जन्सी मध्ये करा जीव वाचल्यावरती आपण बघू यांचं पेमेंट च काय करायचं ते तेवढ्यात भाऊंना थोडा वेळ राजूभाऊंना भेटला आणि पेशंटचा ऑपरेशन रात्री १२.३० वाजता करण्यात आला. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव साहेब भूमिपुत्र वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख श्री राजूभाऊ भोर यांनी त्यांचा लेव्हल वरती या पेशंटला येणारा अडीच लाख रुपये येवढा टोटल खर्च पूर्णपणे मोफत करून दिला. भविष्यात महाराष्ट्रातील कोणालाही वैद्यकीय सेवेसाठी गरज भासल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा.

राजू भाऊ भोर
मो. नं. ०११-२३७४०४१२
०११-२३७४०४१३
केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव साहेब भूमिपुत्र वैद्यकीय मदत कक्ष कार्यालय, महाराष्ट्र बँकेचा बाजूला जिजामाता क्रीडा संकुल, बुलढाणा

# अल्पवयीन मुलीवर त्या नराधमाने केला बलात्कार

**जनसंचलन/बुलढाणा**




अल्पवयीन मुलीवर तिच्या प्रियकराने बलात्कार केल्याप्रकरणी पोलिसांनी २५ फेब्रुवारी रोजी जामनेर येथील प्रशांत चव्हाण याच्या विरोधात बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलगी व आरोपी यांचे ८ आठवड्यांची गर्भवती असल्याचे आले समोर प्रेमसंबंध होते. दोघांनीही एकमेकांच्या सहमतीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले होते. दरम्यान, नातेवाइकाच्या लग्नासाठी पीडित मुलगी ही तिच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गावी गेली होती. तिला त्रास होत रुग्णालयात दाखल केले असता ती ८ आठवड्यांची गर्भवती असल्याचे समोर आले. बुलढाणा पोलिसांत गुन्हा दाखल झाला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सार्वजनिक उत्सव समिती अध्यक्षपदी पत्रकार निलेश राऊत यांची निवड..

जनसंचलन/बुलडाणा

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५च्या अध्यक्ष पदी ईटीव्ही.भारतचे जिल्हा प्रतिनिधी निलेश राउत यांची निवड करण्यात आली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सार्वजनिक उत्सव समिती बुलढाणा २०२५ ची कार्यकारीणी गठीत करण्यासाठी आज बुधवार २६ फेब्रुवारी रोजी स्थानिक विश्राम भवन प्रांगणात बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी पत्रकार निलेश राऊत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. २०२४च्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल कासारे यांनी वैचारीकरित्या त्यांना पदभार दिला. यावेळी शहर व सुंदरखेड परिसरातील आंबेडकरी चळवळीतील सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तथा सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीचे संचलन २०२४चे सचिव विनोद इंगळे यांनी केले. आभार प्रदर्शन अमोल खरे यांनी केले. यावर्षी १४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १४४वा जयंती उत्सव सोहळा साजरा होणार आहे. या सोहळ्याच्या पुर्वतयारीसाठी ही बैठक बोलविण्यात आली होती. यावेळी दिलीपभाऊ जाधव, आशिषबाबा खरात, कुणाल पैठणकर, बाळाभाऊ राऊत, वैशालीताई ठाकरे, पत्रकार दिपक मोरे व सुनिल मोरे यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे व मोठ्या संख्येने बौध्द उपासक व उपासिका उपस्थित होते. २०२५ हे वर्ष सार्वजनिक जयंती उत्सव समिती साठी २१व्या शतकातील रौप्य महोत्सवी वर्ष आहे. छत्रपती शिवाजी



महाराज सार्वजनिक उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार राजेंद्र काळे, महात्मा फुले सार्वजनिक उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार लक्ष्मीकांत बगाडे तर आता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार निलेश राऊत यांची निवड झाली आहे. म्हणजे यावर्षी या तिन्ही जयंती सोहळ्याच्या अध्यक्षपदी बुलढाणा शहरातील ङ्गपत्रकारफ निवडले गेले आहेत, हे येथे उल्लेखनीय!

# साखरखेर्डा येथे वाळू माफियांचा राडा वाहनावर दगडफेक

जनसंचलन/ साखरखेर्डा

खडकपूर्णा नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीच्या वादातून साखरखेर्डा येथील पेट्रोल पंपासमोर दोन वाळू माफियांमध्ये तीव्र वाद होऊन दगडफेक आणि वाहनांची तोडफोड करण्यात आली. ही घटना २५ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. साखरखेर्डा आणि परिसरात दररोज रात्री ८ ते १० टिप्परने वाळूची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिकांनी महसूल विभागाला दिली होती. मात्र, दुर्लक्षामुळे वाळू माफियांना मोकळीक मिळत आहे. २५ फेब्रुवारी रोजी रात्री १० च्या



सुमारास दोन टिप्पर साखरखेर्डा येथे पोहोचले. त्यावेळी वाळू तू का टाकली? यावरून दोघा चालकांमध्ये वाद झाला. एकाने दुसऱ्या वाळू माफियाच्या वाहनावर दगडफेक करून त्याच्या काचा फोडल्या. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला आहे.

# कृषी विज्ञान केंद्र जळगाव (जामोद) येथे किसान सन्मान समारोह कार्यक्रम संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

किसान सन्मान समारोहच्या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील एकूण सहा कृषी विज्ञान केंद्रांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी एक म्हणजे जळगाव जामोद येथील कृषी विज्ञान केंद्र. पी एम किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याच्या लाभ वितरणासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी माजी आमदार कृष्णरावजी इंगळे, आत्मा प्रकल्प संचालक उन्हाळे सर, उपविभागीय कृषी अधिकारी व्यवहारे सर, वरिष्ठ शास्त्रज्ञ जाधव सर, कृषी अधिकारी बनसोडे सर तसेच श्रीमती अपर्णाताई कुटे उपस्थित होत्या. सोबतच तालुक्याच्या विविध भागातील शेतकऱ्यांनी उत्साहाने कार्यक्रमाला हजेरी लावली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गाभणे सर यांनी केले तसेच प्रास्ताविक जाधव सर यांनी केले. व्यवहारे सर यांनी कृषी विभागामार्फत लवकरच मधुमक्षिका पालन व त्यासाठीचे निवासी प्रशिक्षण याचे आयोजन करण्यात येईल याबाबत शेतकऱ्यांना सांगितले. बनसोडे सर यांनी पी एम किसान योजनेच्या पात्र-अपात्र लाभार्थीच्या निकषाबाबतीत मार्गदर्शन केले. उन्हाळे सर यांनी सध्या केंद्र शासनामार्फत राबवित असणाऱ्या ॲग्रिस्टॅक योजनेविषयी सखोल मार्गदर्शन केले तसेच फार्मर आयडी चे महत्व समजावून सांगितले. श्रीमती अपर्णाताई कुटे यांनी गतिमान शासनाच्या संकल्पनेविषयी शेतकऱ्यांना अवगत केले. शेवटी कृष्णरावजी इंगळे यांनी शेतीविषयक धोरण तसेच पीएम किसान व्यतिरिक्त शासनाचा विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन केले. यानंतर उपस्थित शेतकऱ्यांना किसान सन्मान समारोह कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी तालुक्यातील प्रगतशील शेतकऱ्यांना - भानुदास वनारे, सुभाष भाकरे, सचितानंद कुचेकर,



वंदनाताई कोळपे, योगेश जाधव, वासुदेव हिवरकर, राजेंद्र कौलकार व कैलास इंगळे यांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा येथे सुद्धा कार्यक्रम संपन्न झाला असून या कार्यक्रमाला कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ श्री.झापे सर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री देवेंद्र ढगे साहेब, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक श्रीमती संजीवनी कणखर मॅडम, तंत्र अधिकारी श्री अजय वाढे, तालुका कृषि अधिकारी श्री वैभव विश्वे उपस्थित होते, कार्यक्रमामध्ये विविध प्रयोगशील शेतकऱ्यांचे सन्मान चिन्ह देऊन सन्मानित केले व सविस्तर कार्यक्रमाला सुरुवात झाली.

# देवदर्शनाला निघालेल्या अभियंत्याचा मृत्यू

जनसंचलन/ जांभोरा

सिंदखेडराजा तालुक्यातील वर्दडी बु., येथील रहिवासी आणि पुण्यात अभियंता म्हणून कार्यरत असलेल्या कैलास तारांचद चव्हाण (वय ३०) यांचा सातारा जिल्ह्यातील शिराळा येथे कार अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी घडला. प्राप्त माहितीनुसार, कैलास चव्हाण हे पत्नी कांचन चव्हाण (वय २३), सासरे भीमराव पवार (वय ५०), सासू वर्षा पवार (वय ४५) आणि कारचालक पवन संतोष राठोड (रा. आळंदी, मूळ गाव पिंपरखेड, ता. सिंदखेडराजा) यांच्यासह रत्नागिरी जिल्ह्यातील नानीज येथे देवदर्शनासाठी निघाले होते. शिराळा बायपासवरील गोरक्षनाथ मंदिर पुलाजवळ दूध वाहतूक करणाऱ्या वाहनाने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. या अपघातात कैलास चव्हाण यांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य चारजण गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने शिराळा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. कैलास चव्हाण यांच्या अकाली निधनाने वर्दडी बु., येथील बेलवाडी तांड्यावर शोककळा पसरली त्यांच्या पश्चात पत्नी, आहे. आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे.

